# प्रकरण - चौथे

---

# वाळवा आणि शिरगांवातील पूरपरिस्थिती आणि परिणाम

# वाळवा तालुका



# प्रकरण - चौथे

# वाळवा आणि शिरगांवातील पूरपरिस्थिती आणि परिणाम

**प्रस्तावना :**

या प्रकरणाचे मुख्य उद्दिष्ट वाळवा आणि शिरगांव या दोन्ही गावांची भौगोलिक पार्श्वभूमी, पूर येण्यापूर्वीची परिस्थिती आणि पूराची कारणे, पूरपरिस्थिती आणि पूरामुळे झालेले नुकसान व परिणाम, याबाबत माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.

वाळवा आणि शिरगांव दोन्ही गावांचे भौगोलिक परिस्थितीमध्ये साम्यता आढळते. भौगोलिक निरपेक्षस्थान १७.२° उत्तर अक्षवृत्त ते ७४.२२° पूर्व रेखावृत्तावर आहे. तसेच समुद्र सपाटी पासूनची उंची ५५४ मी. इतकी आहे.[१] कृष्णा नदीच्या उजव्या काठावर वाळवा आणि डाव्या काठावर शिरगांव ही दोन्ही गांवे वसलेली आहेत.

नैसर्गिक पूर आपत्ती येण्यापूर्वी २००४ साली दोन्ही गावांमध्ये संपन्नता होती. वाळवा व शिरगांव या गावांची लोकसंख्या अनुक्रमे ३२०१० व १९५० इतकी आहे. शेतीमध्ये प्रमुख पिक म्हणून ऊसाचे घेतले जाते. त्याबरोबरच सोयाबीन, द्राक्षे, केळी, हळद, भूईमुग या पिकांचेही उत्पादन घेतले जाते.

**जलसिंचन :**

दोन्ही गावांची शेती स्वातंत्र्यपूर्व काळात सर्वस्वी पावसावरच अवलंबून असे. परिणामी पावसाच्या प्रमाणाविषयी अनिश्चितता असल्यामुळे शेतीतून पूरेसे उत्पन्न मिळत नव्हते. यावर मात करण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात जलसिंचनाच्या योजना राबविण्यात आल्या. दोन्ही गांवामध्ये सध्या जी शेतीविषयक आर्थिक भरभराट झालेली दिसून येते त्याचे श्रेय सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक नेतृत्त्वगटाकडे जाते. गावांची प्रगती व्हावी

म्हणून गागठाणे गावाजवळ कृष्णा नदीवर बंधारा बांधण्यात आला. तसेच विहिरी खोदणे, तलाव इत्यादीकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन कामे पूर्ण करण्यात आली व त्याद्वारे आज येथील शेतीला पाणीपुरवठा केला जातो.

**साखर उद्योग :**

कृष्णा नदी असल्याने पाणी मुबलक प्रमाणात आहे. त्यामुळे ऊसाचे उत्पादन जास्त प्रमाणात घेण्याची क्षमता मृदेत आहे. हे ओळखून अनेक सहकारी साखर कारखान्यांची उभारणी करण्यात आली. उदा. राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना लि. राजारामनगर, हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना लि. वाळवा त्यामुळे ऊस पिकांचे प्रमाणे वाढत आहे याचा फायदा शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासामध्ये होत आहे.

**दुग्ध विकास :**

शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दूग्ध व्यवसाय ओळखला जातो. हा व्यवसाय शेतकऱ्याला धन, आरोग्य, व समृद्धीचा मार्ग दाखवितो. स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी तत्त्वावरती अनेक दूग्धसंकलन केंद्रांची उभारणी करण्यात आली. उदा. कृष्णा दूध, हुतात्मा दूध, चितळे दूध संघाची यातूनच शेतकरी, सहकारी संस्थांचा विकास झाला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा झाली आहे.

**शैक्षणिक विकास :**

दिवसेंदिवस विद्यार्थी संख्येत वाढ होत आहे त्यामुळे येथे अनेक शाळा, विद्यालय, महाविद्यालयांची स्थापना करण्यात आली. यातूनच यशस्वी विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होत आहे. दोन्ही गावांमध्ये प्रशासकीय, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक या क्षेत्रामध्ये वाढ होत आहे. अशा प्रकारची संपन्नता २००४ सालापर्यंत मजबूत होती. कारण २००४ साली दोन्ही गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झालेली नव्हती.

परंतू २००५-०६ आणि २००६-०७ साली महाभयानक पूर परपरिस्थितीला दोन्ही गांवे बळी पडली आणि त्यांचा विकास पाण्यामध्ये बुडून गेला.

**सांगली जिल्ह्यातील गावांना पूर येण्याची कारणे :**

१) "धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये पडणाऱ्या पावसाची नोंद प्रामुख्याने घेणे आवश्यक आहे. परंतू सदरची नोंद संबंधीत धरण अधिकारी ठेवत नाहीत. त्यामुळे अतिवृष्टी काळात धरण पात्रात येणारे पाणी व धरण पात्रात पडणाऱ्या पावसामुळे धरणात साठणारे पाणी याचे योग्य नियोजन नसल्यामुळे धरणाची उच्चत्तम पातळी पूर्ण होते. त्यामुळे अंदाज चुकतो. त्या अनुषंगाने ऐनवेळी नदीपात्रात मोठ्या प्रमाणात धरणातील पाणी सोडण्यात येऊन पूरपरिस्थिती निर्माण होते."[२]

२) "पाटबंधारे विभागांचे संबंधीत अभियंते सर्व धरणे जून महिन्यामध्ये पूर्ण क्षमतेने भरून घेण्याच्या दृष्टीने नदीपात्रात पाणी सोडत नाहीत. त्यामुळे अचानक जुलै महिन्यामध्ये धरणाच्या वरील प्रदेशात (भागात) पाणलोट क्षेत्रामध्ये तसेच नदी पात्रात पडणाऱ्या पावसामुळे धरण जून अखेर पूर्ण क्षमतेचे अथवा ७५टक्के भरलेले असते. तसेच जुलै मधील पावसामुळे त्वरीत धरणातील पाणी पातळी मध्ये लक्षणीय वाढ होते. त्या अनुषंगाने धरणास धोका उद्‌भवू नये म्हणून धरण अधिकारी धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडतात त्यामुळे नद्यांना पर्यायाने गावांना पूरपरिस्थिती संभावते."[३]

३) "धरण बांधल्यापासून धरणातून गाळ काढण्यात आलेला नाही. धरणाची खोली बऱ्याच अंशी गाळामुळे भरण्यात आलेली आहे. धरणातील गाळ व मान्सून मध्ये पडणारा पाऊस व धरणामध्ये साठणारे पाणी याचे एकत्रीत मोजमाप केले जाते. अशा वेळी धरणामध्ये प्रत्यक्ष पाण्याचा साठा कमी प्रमाणात असून देखील धरणातील गाळ हा पाणी ग्रहीत धरून मोजमाप केले जाते."[४]

४) "धरणाच्या लाभ क्षेत्रामध्ये पडणारा पाऊस व नद्यांना मिसळणाऱ्या लहान मोठया प्रवाहाचा विचार धरणातून पाणी सोडतना केला जात नाही. त्यामुळे सांगली जिल्ह्यातील गावांना पूरपरिस्थिती उद्‌भवते."[५]

५) "नदी पात्रात व नदीकाठावर बंधारे घालून शेतीसाठी, उद्योगासाठी, पाणी वळवून घेतलेले असते. तसेच नदीकाठच्या निळया पट्ट्यामध्ये अतिक्रमणे करून घरे बांधलेली आहेत. पावसाळ्यामध्ये अशा बंधाऱ्यामुळे पावसाचे पाणी पुढे सरकण्यास अडथळे निर्माण होऊन पाण्याच्या प्रवाहाचा वेग कमी होऊन तांत्रीक पूरपरिस्थिती निर्माण होते."[६]

६) "जिल्ह्यात कोयना, चांदोली, धोम, कव्हेर अशा चार धरणातील पाणी एकाच वेळी मोठ्या प्रमाणात सोडल्यामुळे नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होऊन तांत्रीक पूरपरिस्थिती निर्माण होते."[७]

७) "अलमट्टी धरण कर्नाटक राज्यात महाराष्ट्रातून वाहणाऱ्या कृष्णा नदीवर बांधण्यात आल्यामुळे या धरणात अडवलेल्या पाण्याच्या साठ्यात वाढ होते. आणि अलमट्टी धरणातील पाण्याच्या फुगवटा पाठीमागे सरकत येत असल्याने सांगली जिल्ह्यातील गावांना पूराची हानी पोहचते."[८]

८) कर्नाटक सरकारने अलमट्टीच्या ५१९.६ मी. च्या पाणीसाठ्यामुळे महाराष्ट्रातील कोणकोणत्या भागात पूरपरिस्थिती येऊ शकते याचे नकाशे १९९९-२००० या कालावधीत महाराष्ट्र सरकारला पुरवले होते. व ते सरकारने मान्य केले व त्यानंतर धरणाची उंची वाढवणित्यात आली. मात्र या क्षेत्रातील प्रभावितांना विस्थापित घोषित करून त्यांचे पुनर्वसन करणे याबाबत महाराष्ट्र सरकारने हलगर्जीपणा दाखवला."[९]

९) सांगली शहर अभियंता व शहर नियोजकांनी पूररेषेकडे दुर्लक्ष करून त्या क्षेत्रात बांधकामे होऊ दिली. संबंधीत अधिकाऱ्यांनी यात आपला अधिकार न

बजाविल्यामुळे पुराचा तडाखा निरपराध लोकांना बसला व यापुढेही बसू शकतो.[१०]

१०) सांगली-कोल्हापूर जिल्ह्यातील जलसंधारण (Irrigation) विभागातील बहुतांश नकाशामधील धोक्याच्या पूररेषा १९८४ च्या धरणसुरक्षा हस्तपुस्तिकेतील मार्गदर्शनानुसार नेमकेपणाने दाखविलेल्या नाहीत. व हे नकाशे सक्षम अधिकारी, नगरपालिका, पंचायती यांना देणे बंधनकारक असूनही दिले गेलेले नाहीत.[११]

११) कृष्णा नदीला नागमोडी वळण असल्याने पुराची तीव्रता वाढते.

१२) नदीच्या मुखाकडील मैदान भागामध्ये रूंदी खूप कमी आहे. तसेच पूरतट देखील कमी लांबीचे बांधले आहेत.

१३) नदीचे पात्र उथळ बनत आहे कारण वाळु मोठ्या प्रमाणात उपसल्यामुळे नदी पात्रातील पाणी गांवामध्ये लवकर पसरते.

१४) सांगली जिल्ह्यामध्ये अस्तित्त्वात असलेला जिल्हा अपदा निवारण आराखडा अपूरा आहे.

१५) तुंबलेली गटारे, सांडपाणी वाहून नेणाऱ्या यंत्रणेत बिघाड झाल्यामुळे पूरस्थितीला मदत मिळते. तसेच अनाधिकृत बांधकामे आणि बेकायदा अतिक्रमणे यामुळे सांडपाणी, अतिवृष्टीचे पाणी वाहून नेण्याच्या यंत्रणेत अडथळे निर्माण होऊन पूरपरिस्थिती निर्माण होते.

अशा वरील अनेक कारणामुळे सांगली जिल्ह्यातील गावांना तसेच वाळवा आणि शिरगांव या दोन्ही गावांना पूराचा तडाखा बसला आहे.

**पूरपरिस्थिती :**

पूरस्थितीविषयीच्या आपल्या भावना व्यक्त करताना येथील नागरीक म्हणतात की, सन १९१४ च्या महापूराच्या गोष्टी आम्ही जुन्या पिढीकडून ऐकल्या. १९६२ च्या महापूराच्या गोष्टी वडिलांकडून ऐकल्या, १९८३ सालच्या महापूराच्या गोष्टी ऐकत होतो,

१९९४ सालचा महापूर स्वत: अनुभवला.[१२] सन २००५-०६ आणि २००६-०७ सालचा महाभयानक 'पूर' सर्वांवर कडी करणारा होता. स्वत:चे पात्र सोडून पात्राबाहेर पसरत जाणाऱ्या नद्यांनी पश्चिम महाराष्ट्राला उध्वस्त करून टाकले तसेच वाळवा आणि शिरगांव या दोन्ही गावांत पूराने हाहाकार उडवला आणि आम्हा गावकऱ्यांचे वर्तमान आणि भविष्य सुद्धा कृष्णा नदीच्या पाण्यात कोंदडून गेले.

दोन्ही गावामध्ये क्षितिजापर्यंत नजरेत मावणारी ऊस शेती भकास झाली. कृष्णेच्या पुराने शेतकऱ्यांचा घास हिरावून नेला. शेतकरी, शेतमजुर, छोटे व्यापारी, कारागीर यांची उत्पन्नाची-उत्पादनाची साधने नष्ट झाली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसना झाले. भूभागावरील दैनंदिन जीवनात हाहाकार उडाला. वाळवा आणि शिरगांवातील रस्त्यांच्या नद्या झाल्या. वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे अंधारात बुडाली. वस्त्या-वस्त्यांत पाण्याचे लोंढे शिरले. घरंदारं वाहून गेली. गोठ्यातील जनावरं वाहून गेली. पै-न-पै साठवून उभारलेले संसार उध्वस्त झाले. गरीबांच्या घरातलं धान्य, केरोसीन वाहून गेल्यामुळे खायला अन्नाचा कण नाही. अशी परिस्थिती पुरामुळे निर्माण झाली. शिरगांवला बेटाचे स्वरूप प्राप्त झाले होते. चारही बाजूने पाणी लोकांना बाहेर काढण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात अडचण निर्माण झाली.

आपला जीवन वाचवणं सर्वांत महत्त्वाचं असल्यामुळे अंगावरच्या कपड्यानिशी आणि जमेल तेवढं सामान बांधून माणसं वस्त्यांमधून बाहेर काढण्यात आली. कच्ची घरे कोसळली, वस्त्यांमधल्या बालवाड्या उध्वस्त झाल्या. अभ्यासाची वह्या-पुस्तके आणि इतर शैक्षणिक साहित्य पूरामध्ये वाहून गेले. अशा प्रकारची महाभयानक परिस्थिती दोन्ही गांवामध्ये निर्माण झाली. आता दोन्ही गांवातील विविध क्षेत्रातील झालेल्या नुकसानीची माहिती घेऊया.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR



कृष्णा नदीला आलेला पूर



पूराच्या पाण्याने गावाला घातलेला वेढा

## शेतीक्षेत्राचे एकूण नुकसान :

### वाळवा

सन २००५ व २००६ सालामध्ये आलेल्या पुराने थैमान घातले. वाळवा गावांचे एकतृतीयांश भाग पाण्याखाली होता. लाखो एकर शेतांतील पिके नष्ट झाली. नुकसानीचा अंदाज यथावकाश लावण्यात आले आहे. परंतू सर्वकाही पुरात वाहून गेले. शेतकरी, शेतमजूर यांचे उत्पादनाचे साधने नष्ट झाले. या संकटातून पुन्हा उभं राहण्यासाठी कमीत-कमी दहा वर्षे लागतील. हा पूर नैसर्गिक होता की मानवनिर्मित? या पुराचं कारण अस्मानी होतं की सुलतानी अशा प्रकारचे प्रश्न शेतकरी राजा स्वत:ला विचारत होता. पूरआपत्तीमध्ये शेतीचे झालेले एकूण नुकसान खालील कोष्टकामध्ये मांडण्यात आले आहे. पूर येण्यापूर्वीचे एकूण कृषीक्षेत्र ४२३६.७४ हेक्टर होते. या क्षेत्रेमध्ये अनेक प्रकारचे पीक घेतले जात होते. परंतू पूरामध्ये जास्त प्रमाणात या पीकांचे नुकसान झाले. खालील तक्त्यातून नुकसानीचे प्रमाण आढळून येते.

**तक्ता क्र. ४.१**

**एकूण पीकांचे नुकसान ( क्षेत्रफळ आणि आर्थिक )**

| अ.क्र. | बाधीत पीके | बाधीत कृषी क्षेत्र ( हेक्टर ) २००५-०६ | बाधीत कृषी क्षेत्र ( हेक्टर ) २००६-०७ | एकूण नुकसान | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २००५-०६ ( कोटीमध्ये ) | २००६-०७ ( कोटीमध्ये ) | २००५-०६ | २००६-०७ |
| १ | ऊस | ७३०.०२ | ७४०.०५ | ७.४४ | ७.५० | १७.२३ | १७.०० |
| २ | सोयाबीन | ३१५.२० | ३१५.५० | १.२२९२८० | १.२००००० | ७.४३ | ७.२५ |
| ३ | भात | २३.५७ | २५.६० | १.००००० | १.०००८० | ०.५५ | ०.५९ |
| ४ | भुईमुग | २५.५४ | २५.५५ | ८.०४५१० | ३२१४००० | ०.६० | ०.५८ |
| ५ | हळद | ९.१९ | १०.२० | ४११४००० | ५.५३ | ०.२१ | ०.२३ |
| ६ | द्राक्षे | ८३.१५ | ८५.२० | ४.५३ | १८५००० | १.९६ | १.९५ |
| ७ | केळी | ६.२० | ६.५० | १८३७०३ | १२०००० | ०.१४ | ०.१४ |
| ८ | इतर | ३.९६ | ६.०० | १५००० | १८००० | ०.०९ | ०.१३ |

**संदर्भ** - ग्रामपंचायत वाळवा — २००५-०६/२००६-०७

तक्ता क्र. ४.१ वरून २००५-०६ साली एकूण कृषी ४२३६.७४ हेक्टर होते. यामध्ये ऊस क्षेत्राचे सर्वाधिक म्हणजे ७कोटी ४४लाख इतके नुकसान झाले आहे. त्यानंतर द्राक्षे, सोयाबीन, भात या पिकांचे मोठ्या प्रमाात नुकसान झाले आहे. २००५-०६ साली एकूण नुकसान १२ कोटी ६१ लाख ४६ हजार ९३ रूपये इतका आहे.

२००६-०७ साली एकूण कृषीक्षेत्र ४३५० हेक्टर होते. अतिवृष्टी आणि नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतीक्षेत्रांचे जास्त प्रमाण हानी पोहचली आहे. ऊसाचे ७५०००००० रू. इतके नुकसान झाले आहे. एकूण नुकसान १३५१०००८० रू. इतके आहे. अशा प्रकारे या नैसर्गिक आपत्तीने वाळवा या गावातील शेती पिकांचे नुकसाने केले आहे.

**पायाभूत सुविधांचे नुकसान :**

पूर किंवा अतिवृष्टीमुळे पायाभूत सुविधांचे नुकसान करतात. यामध्ये रस्त्यांचे, इमारतींचे, उपसा जलसिंचन, अशा घटकांचे नुकसान होते. त्याच बरोबर लोकांचे, जनावरांचे सहजीवन उध्वस्त होते, अन्न पुरवठा, पाणीपुरवठा, मल: निसारण व संपर्क व्यवस्थाही कोलमडून टाकते. नैसर्गिक आपत्ती लोकांना निर्वासीतही करू शकते किंवा तुम्हाला घरी डांबुनही ठेऊ शकते अशा अनेक पायूभूत घटकांचे नुकसान खालील प्रमाणे आहे.

**नळपाणी पुरवठा योजनेचे नुकसान :**

पाणी पुरवठा करण्यासाठी नदीकाठी जॅकवेलची उबारणी करण्यात आली होती. परंतू नैसर्गिक आपत्तीमध्ये हा जॅकवेल पूराच्या पाण्याने तूटून पाण्यात पडले. त्याची तत्काळ दुरूस्ती करण्यासाठी १६००००/- रू. खर्च करण्यात आले.

गावाला पिण्याचा पाणी पुरवठा करणारी मुख्यजलवाहिनी पूराच्या पात्रात वाहून गेली याचे कारण म्हणजे नदीकडेला असलेली कडा या पूराच्या पाण्यामध्ये वाहून गेली. त्याचे एकूण नुकसान १०००००/- इतके झाले.

पूरस्थितीच्या वेळी नळपाणी योजना बंद पडलेल्या कालावधीत पर्यायी व्यवस्था म्हणून ७००००/- रूपये खर्च करण्यात आले. अशा प्रकारे नैसर्गिक आपततीमध्ये २००५-०६ व २००६-०७ साली एकूण नुसान ३३००००/-रू. इतके आहे. या नैसर्गिक आपत्तीमधील नुकसानीचा फरक पूर ओसरल्यानंतर देखील गावातील लोकांच्या दैनंदिन जीवनावर प्रतिकुल परिणाम निर्माण करून जातात.

**अंतर्गत रस्ते :**

१) मुरमी रस्ते – ७.५० कि.मी.

२) खडीचे रस्ते – ५.५ कि.मी.

३) डांबरी रस्ते – १.० कि.मी.

**जोड रस्ते :**

पडळवाडी, नागठाणे, खेड, बोरगांव, इस्लामपूर, कामेरी, अहिरवाडी, लक्ष्मीरस्ता या जोड रस्त्यांची मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. तसेच खड्डे भरण्यासाठी ५लाख रूपये, पूलांची उंची वाढवून रस्ता पूर्ववत करण्यासाठी एकूण खर्च १.६० लाख रूपये आहे अशा प्रकारे या पूरग्रस्त क्षेत्रामध्ये एकूण २ कोटी ६० लाख रूपये नुकसान झाल्याचे ग्रामपंचायत वाळवा कार्यालयामध्ये आहे.

**वैयक्तीक नुकसान :**

अतिवृष्टी आणि पूरपरिस्थिती निर्माण झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी नदीकडेला बसविलेले विद्युत पंपाचे नुकसान खालील प्रमाणे आहे.

१०एच.पी. चे विद्युत पंपाचे नुकसान

किंमत × शेतकरी = एकूण नुकसान

१४००० × ३५० = ४९,००,०००/- रूपये

इतक्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. तसेच धान्य, औजारे, खते, पशुखाद्य या घटकांचे ७०,०००/- रूपये नुकसान झाले आहे.

**उपसा जलसिंचन :**

शेतीप्रधान देशामध्ये शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी सहकार तत्त्वावर उपसा जलसिंचन योजनांचे अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. वाळवा गांवामध्ये अनेक सहकारी तत्त्वावरती उपसा जलसिंचन योजना आहेत त्यांची नांव आणि झालेले नुकसानीची आकडेवारी खालील प्रमाणे देण्यात आली आहे.

**तक्ता क्र. ४.२**

**उपसा जलसिंचनाचे नुकसान**

| क्र. | उपसा जलसिंचन योजनेचे नांव | एकूण नुकसान ( लाखात ) |
|---|---|---|
| १. | मगदूम पाणी पुरवठा स्कीम | ५०००००/- |
| २. | लक्ष्मी पाणी पुरवठा स्कीम | २०००००/- |
| ३. | उरूण पाणी पुरवठा स्कीम | १५००००/- |
| ४. | नायकवडी पाणी पुरवठा स्कीम | १५००००/- |
| | **एकूण नुकसान** | **१००००००/-** |

**संदर्भ -** ग्रामपंचायत वाळवा — सन २००५ ते २००७

तक्ता क्र. ४.२ वरून उपसाजलसिंचन योजनांच्या नुकसानीचा अंदाज येतो. वरील उपसा जलसिंचनाद्वारे शेतीला पाणीपुरवठा करण्यात येत होते. त्यामुळे वाळवा गावातील शेतकऱ्यांच्या शेतामधेल पीके हिरवेगार होते. आणि उत्पन्न देखील मोठया प्रमाणेत मिळत होते. परंतू पूर आणि अतिवृष्टीमुळे उपसाजलसिंचनाचे एकूण रूपये १००००००/- इतक्या मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे.

**कारागिरांचे एकूण नुकसान :**

नैसर्गिक आपत्तीमध्ये छोटे-मोठे उद्योग करून आपले जीवन जगणाऱ्या कारागीरांचे देखील नुकसान पूराच्या पाण्यामध्ये झालेले आहे. स्वत:साठी, कुटुंबासाठी उदरनिर्वाह करणारे अनेक कारागीरांचे या पूरामध्ये नुकसान झाले त्या कारागीरांची नांवे आणि एकूण नुकसानीची रक्कम खालीलप्रमाणे आहे.

## तक्ता क्र. ४.३
## कारागीरांचे नुकसान

| क्र. | कारागीरांचे नांव | एकूण नुकसान |
|---|---|---|
| १. | अशोक कणसे | ५००००/- |
| २. | संजय लोहार | ४५०००/- |
| ३. | रामराव बागल | ४००००/- |
| ४. | शहाबुद्दीन सुतार | ३००००/- |
| | **एकूण नुकसान** | **१६५०००/-** |

**संदर्भ -** ग्रामपंचायत वाळवा — सन २००५ ते २००७

तक्ता क्र. ४.३ वर दिलेल्या कारागीरांचे नुकसान झाले आहे त्यामध्ये सर्वात जास्त नुकसान अशोक कणसे रू. ५००००/-, संजय लोहार रू. ४५०००/-, रामराव बागल रू. ४००००/-, शहाबुद्दीन सुतार रू. ३००००/- असे नुकसान अतिवृष्टी आणि पुरामुळे झालेले आहे. त्या सर्वांचे एकूण नुकसान रू. १६५०००/- इतके आहे.

अतिवृष्टी आणि पूर या आपत्तीमध्ये ग्रामपंचायत मालकीच्या काही इमारतींचे नुकसान झाले आहे त्यामध्ये अंगणवाडी, शाळा, शौचालय, समाजमंदिर (सार्वजनिक), स्मशानभूमी इ. इमारतींचे एकूण नुकसान आकडेवारी खालीलप्रमाणे.

## तक्ता क्र. ४.४
## ग्रामपंचायत मालकीच्या इमारतीचे नुकसान

| क्र. | बाधीत इमारती | एकूण नुकसान |
|---|---|---|
| १. | अंगणवाडी — आहार, साहित्य | ३०५०००/- |
| २. | शाळा — विद्युतीकरण, फर्नीचर, स्टेशनरी | ४०००००/- |
| ३. | सार्वजनिक शौचालय | १०००००/- |
| ४. | समाज मंदिर (सार्वजनिक) | २५००००/- |
| ५. | स्मशानभूमी | १५००००/- |
| ६. | इतर | ५०००००/- |
| | **एकूण नुकसान** | **१७०५०००/-** |

**संदर्भ -** ग्रामपंचायत वाळवा — सन २००५ ते २००७

तक्ता क्र. ४.४ वरून ग्रामपंचायत इमारतींचे पूर व अतिवृष्टीमुळे नुकसान झाले आहे. शाळेमध्ये असलेले फर्नीचर, स्टेशनरी, विद्युतीकरण यांचे एकूण नुकसान रू. ४०००००/-, अंगणवाडी-आहार, इतर साहित्य रू. ३०५०००/- तर सार्वजनिक शौचालय, समाज मंदिर, स्मशानभूमी व इतर असे एकूण नुकसान रू. १७०५०००/- इतके आहे.

पूरपरिस्थिती वाळवा गावांमध्ये निर्माण झाल्यानंतर पशुधनाचे विस्थापन करण्यात आले. गाय आणि म्हैस या दोन्हींची एकूण संख्या ३९०८ होती. त्यापैमी १२६० पशुधनाचे पडळवाडी, बागणी, गोटखिंडी, येलूर, हुतात्मा सहकारी साखर कारखाना या ठिकाणी विस्थापन करण्यात आले तसेच जनावरे पाण्यामध्ये बुडून मयत झाली त्यांचे एकूण नुकसान खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ४.५**

**विस्थापित पशुधनांचे एकूण नुकसान**

| अ.क्र. | जनावरे | मृत संख्या | प्राण्यांची अंदाजे किंमत | एकूण नुकसान रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | गाय | १ | २००००/- | २००००/- |
| २ | म्हैस | ४ | १५०००/- | ६००००/- |
| ३ | बैल | १ | १२०००/- | १२०००/- |
| ४ | रेड्या | ४ | २५००/- | १००००/- |
| ५ | डुक्कर | १३० | १०००/- | १३००००/- |
| | एकूण | १४० | ५०५००/- | २३२०००/- |

**संदर्भ -** ग्रामपंचायत वाळवा — सन २००५ ते २००७

तक्ता क्र. ४.५ वरून सर्वात जास्त नुकसान डुक्कर या पशुधनाचे झालेले आहे. कारण या पशुधनाकडे दुर्लक्ष झालेले होते. या पशुचे विस्थापन करण्यात आले नाही. पूराच्या पाण्यामध्ये वाहून गेले त्यामुळे डुक्कर पशुधनाचे रू. १३००००/-, म्हैस रू. ६००००/-, गाय रू. २००००/-, बैल रू. १२०००/-, रेड्या रू. १००००/- अशा पशुधनाचे नुकसान झाले आहे. वाळवा गावामध्ये १७६ गोठ्यांची पडझड झाली होती.

१७६ x १५००० = २६४००००/- रूपये इतके नुकसान झाले आहे. त्याच बरोबर पशुवैद्यकिय दवाखन्याचे ३२५०००/- नुकसान झाले आहे.

पूराच्या कालावधीमध्ये दूध उत्पादनावर विपरित परिणाम झाला आहे. ८ दिवस पूराचे पाणी वाळवा गावामध्ये होते तेव्हा दूध उत्पादनाचे एकूण नुकसान खालील प्रमाणे देण्यात आले आहे.

दिवस x लिटर x दर = एकूण नुकसान

८ x ४५० x १६ = रू. ५७६००/-

वरील प्रमाणे नुकसान झाले आहे. त्याचप्रमाणे वाळवा गावातील घराचे नुकसान झाले त्यांची एकूण आकडेवारी खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ४.६**
**बाधीत घरांची माहिती**

| अ.क्र. | बाधीत घरांची माहिती | बाधीत घरांची संख्या | एकूण नुकसान रक्कम |
|---|---|---|---|
| १ | पूर्णत: पडझड घरे | ९० | ४७०००००/- |
| २ | अंशत: पडझड घरे | २५५४ | ६१२९६००/- |
| ३ | बाधीत दुकाने / टपऱ्या | २१३ | ५३२५००/- |
| | **एकूण** | **२६६५** | **११३६२१००/-** |

**संदर्भ -** ग्रामपंचायत वाळवा — सन २००५ ते २००७

तक्ता क्र. ४.६ वरून पूर्णत: बाधीत घरांची संख्या ९० आहे त्याचे एकूण नुकसान रू. ४७०००००/-, अंशत: पडझड झालेली घरे २५५४ आहे त्याचे एकूण नुकसान रू. ६१२९६००/-, बाधीत दुकाने-टपऱ्या २१३ आहेत त्यांचे नुकसान रू. ५३२०००/- इतके आहे. अशा प्रकारे पूर परिस्थितीमध्ये निवास, दुकाने, टपऱ्यांचे नुकसान झालेले आहे. पूर परिस्थिती मध्ये जास्त प्रमाणात लोकांनी विस्थापीत व्हावे लागले.

२००५-०६ व २००६-०७ मध्ये आलेल्या पुराने थैमान घातले, शेतकरी, शेतमजूर, छोटे व्यापारी, कारागीर यांची उत्पन्नाची, उत्पादनाची साधने नष्ट झाली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले. हजारो हेक्टर भूभागावरील दैनंदिन जीवनात हाहाकार उडाला होता. आता शिरगांव गावाबद्दल माहिती घेऊया.

## शिरगांव, ता. वाळवा, जि. सांगली

कृष्णा नदीच्या डाव्या तिरावर वसलेले लहान क्षेत्रफळ असलेले शिरगांव हे गांव आहे. कृष्णा नदीमधील पाणी उपसाजल सिंचनाद्वारे पाणी व्यवस्थापन करून जास्त प्रमाणात ऊस या पिकाचे उत्पादन घेतले जाते. भूईमुग, सोयाबीन, फळपिक, भाजीपाला अशा पिकांची उत्पदाने घेतली जातात. शिरगांवची एकूण लोकसंख्या १९५० इतकी आहे. तसेच शिरगांवमधील लोकांना बाहेर पडण्यासाठी होडीचा वापर करावा लागतो. होडी गावकऱ्यांची जीवनसाथी म्हणून ओळखली जाते.

२००५-०६ आणि २००६-०७ साली आलेल्या पूराने शिरगांवातील सर्व पीके पाण्याखाली गेली. एकूण २६३ हेक्टर कृषीक्षेत्र असलेल्या शिरगांवचे १६२ हेक्टर कृषीक्षेत्र पाण्याखाली गेले होते. अशा सर्व पाण्याखाली गेलेल्या पीक नुकसानीची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

### तक्ता क्र. ४.७

### कृषी पीकांचे नुकसान

| अ.क्र. | बाधीत पीके | एकूण हेक्टरी नुकसान | एकूण नुकसान रक्कम | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | ऊस | ४७ | ४७९७९९५ | १७.८७ |
| २ | भूईमुग | ५ | ३६००० | १.९० |
| ३ | सोयाबीन | २४ | ७८०००० | ९.१२ |
| ४ | धान्याचे क्षेत्र | ५० | १२०००० | १९.०० |
| ५ | फळ पिक | २० | ८१००० | ७.६० |
| ६ | भाजीपाला | १६ | ५२००० | ६.०८ |
| | एकूण | १६२ | ५८६६९९५ | ६१.५७ |

**संदर्भ -** ग्रामपंचायत शिरगांव – सन २००५ ते २००७

तक्ता क्र. ४.७ वरून पूर आपत्तीमध्ये ऊस पीकांचे ४७ हेक्टर नुकसान झाले आहे. धान्य क्षेत्राचे ५० हेक्टर मधील पीक पाण्याखाली गेले आहे. तसेच १६२ हेक्टर बाधीत पीकक्षेत्राचे एकूण नुकसान रू. ५८६६९९५/- इतक्या प्रमाणात शिरगावचे २००५-०६ व २००६-०७ साली नुकसान झाले आहे.

**विस्थापित पशुधनाचे नुकसान :**

नैसर्गिक आपत्ती किती भयानक स्वरूप धारण करू शकते याचा प्रत्यय शिरगांवला सन २००५-०६ आणि २००६-०७ साली आला. अतिवृष्टी आणि पूरामुळे सर्वस्व हरवलेली अवस्था लोकांना पहायला मिळाली. अशा परिस्थितीत स्वत:चा जीव वाचविण्यासाठी धडपडण्याचा प्रयत्न लोक करीत होते. परंतू पशुधनाचा देखील विचार केला जात होता. काही पशुधनाचे सुरक्षीत ठिकाणी हालविण्याचे प्रयत्न करण्यात आले. परंतू काही प्रमाणात या पशुधनाचे नुकसान झाले याची एकूण आकडेवारी खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ४.८**

**पशुधनांचे नुकसान**

| अ.क्र. | पशुधनाचे नांव | एकूण संख्या | विस्थापित संख्या | एकूण नुकसान रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | गाय | ३०१ | ०२ | ४००००/- |
| २ | म्हैस | ६९५ | ०५ | ७५०००/- |
| ३ | बैल | ३५ | ०२ | २४०००/- |
| ४ | रेड्या / मेंढ्या | १७० | ०५ | १२०००/- |
| ५ | कोंबड्या | ३०२ | ३० | २०००/- |
| | एकूण | १५०३ | ४४ | १५३०००/- |

**संदर्भ -** ग्रामपंचायत शिरगांव — सन २००५ ते २००७

तक्ता क्र. ४.८ वरून नैसर्गिक आपत्तीमुळे विस्थापित पशुधनाचे एकूण नुकसान दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वाधिक म्हैस ६९५, कोंबड्या ३०२, गाय ३०१,

रेड्या १७० आणि बैल ३५ अशा एकूण १५०३ इतकी पशुधनाची संख्या होती त्यापैकी ४४ पशुधनाचे २००५-०६ व २००६-०७ सालच्या पुरामध्ये नुकसान झाले त्याची एकूण रक्कम रू. १५३०००/- इतकी आहे. अशा प्रकारे शिरगांवचे नुकसान झाले आहे.

**घरांचे एकूण नुकसान :**

पूर या नैसर्गिक आपत्ती उद्‌भवल्यानंतर शिरगांवला बेटाचे स्वरूप प्राप्त होते. चारही बाजूला पाणीच-पाणी. गाव सोडून सुरक्षित ठिकाणी जाण्यास पूर ही नैसर्गिक आपत्ती भाग पाडते. पुरामुळे शिरगांवातील घरांची फार मोठ्या प्रमाणात नुकसान होते. त्याची एकूण आकडेवारी खालीलप्रमाणे देण्यात आली आहे. तसेच १९५० इतकी लोकसंख्या असलेले शिरगांवमध्ये ६९५ घरांची संख्या आहे. काही घरांचे नुकसान झालेले आहे.

**तक्ता क्र. ४.९**

**घरांचे एकूण नुकसान**

| अ.क्र. | बाधीत घरांची माहिती | बाधीत घरांची संख्या | एकूण नुकसान रक्कम |
|---|---|---|---|
| १ | पूर्णत: पडझड घरे | १४ | ७०००००/- |
| २ | अंशत: पडझड घरे | ५६ | १४००००/- |
| | एकूण | ७० | ८४००००/- |

**संदर्भ** - ग्रामपंचायत शिरगांव — सन २००५ ते २००७

तक्ता क्र. ४.९ वरून ७० घरांना पूराचा तडाखा बसला आहे. त्यामध्ये पूर्णत: बाधीत घरांची संख्या १४, अंशत: बाधीत घरांची संख्या ५६ आहे. या एकूण बाधीत घरांचे नुकसान ८४००००/- इतके आहे.

## वाळवा आणि शिरगांवातील पुरपरिस्थितीची छायाचित्रे



पुराच्या पाण्याने शेती पीकाचे झालेले नुकसान



पुराच्या पाण्यामुळे शेतातील पीके कुजून झालेले नुकसान



पुराच्या पाण्यामुळे घरातील वस्तुंचे झालेले नुकसान



पुरामुळे झालेली घरांची पडझड



पुरग्रस्त लोक स्थलांतर करताना





पुरग्रस्त भागातील विस्थापित जनावरे




पुरग्रस्त लोकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करताना



पुरग्रस्त भागात मदत कार्यासाठी आलेले जवान

**ग्रामपंचायतीने घेतलेली आरोग्याची दक्षता :**

वाळवा आणि शिरगांव या दोन्ही गांवामध्ये पूराचे पाणी पसरल्याने घाणीचे साम्राज्य निर्माण झाले होते. या साम्राज्यातून विविध प्रकारच्या साथीचे रोग पसरू नयेत म्हणून वाळवा आणि शिरगांव ग्रामपंचायतीने दक्षता घेतली होती. त्यासाठी खालील घटकांचा वापर करण्यात आला होता.

**तक्ता क्र. ४.१०**
**रोगराई प्रतीबंधात्मक उपाययोजना**

| अ.क्र. | गाव | धुरळणी विभाग | | डिझेल लिटर | ऑईल लिटर | पेट्रोल लिटर | मेडीक्लेर वाटप घरांची संख्या | गप्पी मासे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मॅलीथान किलो | फॉलीडॉल किलो | | | | | |
| १ | वाळवा | २०० | २०० | -- | १५० | -- | ४८७५ | २३ |
| २ | शिरगांव | -- | २५० | १५ | १० | ०५ | ६०० | -- |

संदर्भ - ग्रामपंचायत वाळवा आणि शिरगांव २००७.

तक्ता क्र. ४.१० वरून वाळवा आणि शिरगांव या दोन्ही गावातील ग्रामपंचायतीने रोगराईपासून गावातील लोकांची सुटका करण्यासाठी धुरळणी केली होती. त्यामध्ये मॅलीथान, फॉलीडॉल, डिझेल, पेट्रोल, ऑईल या नैसर्गिक तेलांचा, वायूंचा वापर केला होता. गप्पी मासे सोडण्यात आले होते.

पूरामुळे गावामध्ये साचलेल्या गाळाची विल्हेवाट लावण्यासाठी डंपर, ट्रॉली या वाहनांचा वापर करण्यात आला होता. या घनकचऱ्यावर फॉलीडॉलची फवारणी करण्यात आली होती. तसेच औषध, तपासणी, जखमींना योग्य प्राथमिक उपचार अशा अनेक प्रकारची आरोग्याची दक्षता घेण्यात आली होती.[१३]

महाराष्ट्र शासन आणि सांगली जिल्हा प्रशासनाला वरील नमुद केलेल्या सालामध्ये गावातील पूर येण्याचा अंदाज होता. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने पूर्व तयारी करून खालील अन्नधान्य, रॉकेल, आणि सानुग्रह अनुदानाचे वाटप सुद्धा केलेले होते. याबद्दलची माहिती खालीलप्रमाणे.

**पूर येण्यापूर्वी आगावू धान्य वाटप करण्यात आले :**

**वाळवा आणि शिरगांव**

पूराची गंभीर परिस्थिती उद्‌भविण्यापूर्वी वाळावा आणि शिरगांव मध्ये काही प्रमाणात धान्याचे वाटप करण्यात आले होते. त्याची माहिती खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र. ४.११**

**वाळवा आणि शिरगांवातील स्वस्त अन्न धान्य वाटप**

| अ.क्र. | गाव | दुकानाचे नांव | कार्ड संख्या | | | गहू क्विंटल | तांदूळ क्विंटल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | केसरी | पिवळी | अंत्योदय | | |
| १ | वाळवा | एस.एस. बिरनाळे | ६२३ | ८० | १६ | ३६ | २० |
| २ | वाळवा | लक्ष्मी महिला ग्राहक भांडार | ८०५ | ९४ | २३ | २९ | २५ |
| ३ | शिरगांव | एस.बी. शिंदे | २६३ | २० | ०६ | १२ | ०६ |
| | | एकूण | २६९१ | १९४ | ४५ | ७७ | ५१ |

संदर्भ - तहसिल कार्यालय, इस्लामपूर २००५-२००७

तक्ता क्र. ४.११ नुसार पूरपरिस्थिती उद्‌भविण्यापूर्वी शासन पातळीवर योग्य निर्णय घेऊन आगावू धान्य वाटप करण्यात आले. वाळवा गांवामध्ये दोन स्वस्त धान्य दुकानांकडून देण्यात आले. एस.एस. बिरनाळे आणि लक्ष्मी महिला ग्राहक भांडार, केसरी, पिवळी, अंत्योदय या सर्व कार्ड धारकांना गहू, तांदूळ देण्यात आले.

शिरगांव गांवामध्ये एस.बी. शिंदे या स्वस्त धान्य दुकानातून धान्य पुरवठा करण्यात आला. शिरगांवचे केसरी कार्डधारकांची संख्या सर्वाधिक २६३ इतकी होती, पिवळी-२०, अंत्यादय-०६ अशी एकूण २८९ कार्डधारकांना धान्य देण्यात आले.[१४]

गंभीर पूराचा धोका टाळण्यासाठी आगावू धान्य वाटप करून नियोजनात्मक कार्यवाहीची सुरूवात करण्यात आली होती. वाळवा आणि शिरगांव या दोन्ही गावांतील एकूण कार्डधारक केसरी-२६९१, पिवळी-१९४, अंत्योदय-४५ इतक्या लोकांनी फायदा घेतला.

**पूरग्रस्त भागातील कुटुंबाना मोफत धान्य आणि केरोसीन वाटप करण्यात आले.**

मुसळधार पाऊस आणि पूराने वाळावा आणि शिरगांव गावांचा वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे अंधारात बुडाली होर्त. वस्त्या-वस्त्यांत पाण्याचे लोंढे शिरले. घरेदारे वाहून गेली, गोठ्यातील जनावरे वाहून गेली. पै-न-पै साठवून उभारलेले संसार उद्ध्वस्त झाले. आयुष्यभराची कमाई वाहून गेली होती. गरीबांच्या घरातील धान्य, केरोसीन वाहून गेल्यामुळे खायला अन्नाचा कणही नव्हता. अशा परिस्थितीत शासनाने मोफत धान्य, केरोसीन वाटप केले त्याची आकडेवारी खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र. ४.१२**

**पूरग्रस्त लोकांना अन्न-धान्य आणि रॉकेल यांचे वाटप**

| अ.क्र. | साल | गाव | बाधीत कुटुंब संख्या | तांदूळ क्विंटल | ज्वारी क्विंटल | केरोसीन लिटर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००५-०६ | वाळवा | २००० | २०० | २०० | २०००० |
| २ | २००६-०७ | वाळवा | १९७ | १९.७० | १९.७० | १९७० |
| ३ | २००५-०६ | शिरगांव | १७० | १७.०० | १७.०० | १७०० |
| ४ | २००६-०७ | शिरगांव | १८१ | १८.१० | १८.१० | १८१० |
| | | एकूण | २५४८ | २५४.८० | २५४.८० | २५४८० |

संदर्भ - तहसिल कार्यालय इस्लामपूर २००५ ते २००७

तक्ता क्र. ४.१२ वरून वाळावा गांवातील बाधीत कुटुंबसंक्या २००६-०७ च्या तुलनेने २००५-०६ साली जास्त आहे आणि शिरगांव गावातील २००५-०६ सालच्या तुलनेने बाधीत कुटुंबांची संख्या २००६-०७ साली जास्त आहे. बाधीत कुटुंबांना तांदूळ, ज्वारी, केरोसीनचे वाटप करण्यात आले होते. वाळवा आणि शिरगांव या दोन्ही गावांची एकूण वाटपाची आकडेवार्र तांदूळ २५४.८०क्विंटल, ज्वारी २५४.८० क्विंटल, केरोसीन २५४८० लिटर इतके वाटप करण्यात आले होते. यावरून आपणास असे दिसते की, पूरापासून काही गरीब कुटुंबांना आपत्तीपासून सावरण्यासाठी मदत मिळाली.[१५]

**निराधार झालेल्या कुटुंबाना सानुग्रह अनुदान वाटप :**

वाळवा आणि शिरगांव गावांमध्ये पाऊस व पूराने अनेकांचे जे अतोनात नुकसान झाले. त्यांचे संसार उभारण्यासाठी शासकीय सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले त्याची एकूण आकडेवारी खालील प्रमाणे.

**तक्ता क्र. ४.१३**

**निराधार कुटुंबाना शासनाने दिलेले सानुग्रह अनुदान**

| अ.क्र. | साल | गावाचे नांव | स्थलांतर कुटुंब संख्या | निराधार कुटुंब संख्या | पात्र निराधार व्यक्ती | सानुग्रह वाटप कुटुंबे | सानुग्रह वाटप रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००५-०६ | वाळवा | २५०० | ११६७ | ७१९३ | ११६७ | ७१९३००० |
| २ | २००६-०७ | वाळवा | १३६० | ७५७ | ३२१९ | ७५७ | ३२१९००० |
| ३ | २००५-०६ | शिरगांव | १५० | १३० | ५६० | १३० | ६४४००० |
| ४ | २००६-०७ | शिरगांव | १२५ | ११९ | ५२२ | ११९ | ११५७८००० |

**संदर्भ -** तहसिल कार्यालय, इस्लामपूर – २००५ ते २००७

तक्ता क्र. ४.१३ वरून वाळवा आणि शिरगांव दोन गांवातील २००५-०६ साली आणि २००६-०७ आलेल्या पुरामध्ये अनेक कुटुंबांना स्थलांतर करावे लागले. दोन्ही गावांतील ४१३५ कुटुंबे स्थलांतरीत करण्यात आली. निराधार कुटुंब संख्या २१७३, पात्र निराधार व्यक्ती ११४९४ इतकी आहे. शासनाने सानुग्रह अनुदान म्हणून २००५-०६ साली आणि २००६-०७ साली एकूण दोन्ही गांवामधील वाटप रू. १,१५,७८०००/- २१७३ कुटुंबांना करण्यात यश मिळविले.[१६]

पूरपरिस्थितीमध्ये अनेक लहान उद्योगांना फटका बसला त्यांना देखील शासनाने मदत केली होती. वाळवा आणि शिरगांव या दोन्ही गावांतील अनेक दुकानदार, टपरी, खोकी धारकांना नुकसान झालेले होते. भरपाई मिळवून घेण्यासाठी नुकसान झालेल्या वस्तू, टपऱ्या, दूकान, घर, जनावरे यांचे पंचनामे करणे आवश्यक होते. अशा कार्यपद्धतीनुसार नुकसान झालेल्या दुकान, टपऱ्यांची माहिती आणि त्यांना मिळालेली मदत पुढील तक्त्यातून दिलेली आहे.

## तक्ता क्र. ४.१४

## दुकान आणि टपऱ्या धारकांना दिलेली मदत

| अ.क्र. | साल | गावांचे नांव | बाधीत दुकान/टपऱ्या | एकूण दिलेली रक्कम ( पंचनामा करून ) |
|---|---|---|---|---|
| १ | २००५-०६ | वाळवा | ८० | ४४००००/- |
| २ | २००६-०७ | वाळवा | ७५ | ४१२५००/- |
| ३ | २००५-०६ | शिरगांव | ०५ | २७५००/- |
| ४ | २००६-०७ | शिरगांव | ०३ | १६५००/- |
| | | एकूण | १६३ | ८९६५००/- |

**संदर्भ -** वाळवा आणि शिरगांव ग्रामपंचायत तसेच तहसिल कार्यालय, इस्लामपूर २००५-०७.

तक्ता क्र. ४.१४ वरून दुकान/टपऱ्या/खोके यांना पूराचा फटका मोठ्या प्रमाणात बसला. त्यांना पुन्हा जिद्दीने उभे करण्यासाठी शासनाने मदत वाटप केली होती. वाळवा आणि शिरगांव या दोन्ही गांवामधील एकूण बाधीत संख्या १६३ होती त्यांना शासनाने एकूण रक्कम रू. ८९६५०० देण्यात आली होती. २००५-०६ साली ८० दुकानधारकांची दुकाने/टपऱ्या बाधीत झाल्या होत्या. आणि २००६-०७ साली ७५ दुकाने/टपऱ्या बाधीत झाल्या होत्या. शिरगांव मध्ये २००५-०६ आणि २००६-०७ या दोन्ही वर्षामध्ये ०८ दुकाने/टपऱ्या बाधीत झाल्या होत्या. या सर्व बाधीत दुकानदारांना शासनाने मदत केली.

**मृत व्यक्तींच्या वारसांना दिलेली मदत :**

शिरगांव आणि वाळवा गांवामध्ये अतिवृष्टी आणि पुरामुळे वस्त्यामध्ये पाणी शिरले अक्षरश: वाताहत झाली होती. मुळात पावसाचे साठलेले पाणी, नाले तुडुंब भरल्यामुळे आलेले पाण्याचे लोंढे आणि तोडक्या-मोडक्या छपरांतून गळणारे पाणी या दोन्ही गावांतील स्थिती भयावह झाली होती.

वाळवा गावामध्ये माणसं व साहित्य वस्त्यांमधून सुरक्षीत ठिकाणी हलवले असताना एक लहान बालक वाहून गेले. त्यासाठी शासनाने त्या मृत बालकाच्या वारसांना खालील प्रमाणे मदत देण्यात आली.

**तक्ता क्र. ४.१५**

**मृतांच्या वारसांना दिलेली शासकीय मदत**

| अ.क्र. | मृत बालकाचे नांव | वाटप केलेले अनुदान | मृत बालकाच्या वारसाचे नांव | खाते असलेल्या बँकेचे नांव | खाते क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | एस.एस. धुमाळे | ५०,०००/- | सौ. आर. एस. धुमाळे | हुतात्मा बँक वाळवा | १६२४२ |

संदर्भ - तहसिल कार्यालय, इस्लामपूर २००५.

१८ वर्षाखालील बालकांच्या वारसांना शासनाने रू. ५० हजार मदत केली.[१७]

अशा प्रकारे अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीत संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये जिवीत, वित्त आणि शेतीची अपरिमित हानी होऊ नये म्हणून राज्यशासनाने कंबर कसली व आपल्या सर्व यंत्रणा गतिमान ठेवून लष्करापासून ते सामान्यांना मदत कार्यात सामिल करून घेण्याचा आणि प्राणहानी टाळण्यास सर्वाच्च प्राधान्य देण्याची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच अन्नधान्य, केरोसीन व रोख मदतीच्या उपाययोजना केल्या.

वरील नमुद केलेल्या माहितीच्या विश्लेषणातून असे स्पष्ट होते की, राज्य आणि जिल्हा प्रशासक पूरग्रस्तांना पूर येण्यापूर्वी आणि तद्नंतर यथोच्छित विविध रितीची मदत केलेली आहे हे स्पष्ट होते. आता सहकारी संस्था यांनी केलेल्या योगदानाबद्दल माहिती पाहुया.

**हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान लि. वाळवे केलेली मदत :**

नैसर्गिक आपत्तीच्या मदत कार्यामध्ये नेहमीच अग्रेसर असलेला हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना लि. वाळवे यांनी शेतकऱ्यांना काही प्रमाणात मदत केली आहे त्याची खालीलप्रमाणे आकडेवारी आहे.

**तक्ता क्र. ४.१६**

**२००५ ते २००७ पूरग्रस्त शेतकऱ्यांना कारखान्याने दिलेली मदत**

| अ.क्र. | वर्ष | शेतकरी संख्या | पूरात बुडीत क्षेत्र हेक्टरमध्ये | ऊस बेणे अनुदान ५०%रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २००५-०६ | ०८ | ३.२० | ९३१५.०० |
| २ | २००६-०७ | ०८ | ३.५३ | ११३८७.५० |
| | एकूण | १६ | ६.७३ | २०७०२.५० |

संदर्भ - हुतात्मा साखर कारखान वाळवे, २००५ व २००७

वरील माहितीनुसार वाळावा गावातील शेतकऱ्यांना ६.७३ हेक्टर पूरबुडीत क्षेत्राला अनुदान ५०% म्हणून २०७०२.५० इतक्या रक्कमेची मदत १६ शेतकऱ्यांना देण्यात आली होती. वाळावा आणि शिरगांव गावांमधील पूरग्रस्त लोकांना राहण्याची आणि जेवण्याची व्यवस्था देखील हुतात्मा कारखान्याने केली होती. त्याची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.[१८]

**तक्ता क्र. ४.१७**

**स्थलांतरीत पूरग्रस्तांची संख्या आणि त्यांचे पुर्नवसन**

| अ.क्र. | गाव | स्थलांतरित व्यक्तींची संख्या | | | स्थलांतरित ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | लहान | मोठे | एकूण | | |
| १ | वाळवा | १८२० | ३४२० | ५२५० | कामगार भवन, मराठी शाळा नं.२ वाळवा | जेवण व्यवस्था हुतात्मा साखर कारखान्यामार्फत |
| २ | शिरगांव | ६३ | १९८ | २६१ | कामगार भवन नातेवाईकांच्या घरी | जेवण व्यवस्था हुतात्मा साखर कारखान्यामार्फत |

संदर्भ - हुतात्मा साखर कारखाना २००५ ते २००७

तक्ता क्रमांक ४.१७ वरून हुतात्मा किसन अहिर सह. साखर कारखान्याने माणुसकीचे नाते जोडत आपत्तीग्रस्ताना राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था वरीलप्रमाणे केली होती. वाळवा गावातील ५२५० लोकांना आणि शिरगांवातील लोकांना जेवण आणि राहण्याची सोय उपलब्ध करून पूरग्रस्तांना मदतीचा हात दिला. तेव्हाच पूरग्रस्त लोक संकटाला योग्य पद्धतीने सामोरे जाण्यासाठीची मानसिक तयारी दाखविली.[१९]

**पुराचे परिणाम :**

नैसर्गिक आपत्तीपैकी पूर येणे ही एक नेहमीचीच आपत्ती तरीही ती केवळ मुसळधार पावसामुळेच येते असे नाही. मानवाची प्रगती व त्यासाठी पर्यावरणात होत असलेला हस्तक्षेप यामुळे आपत्तीमध्ये होणाऱ्या हानीतही वाढ झालेली आहे. निसर्गव्यवस्थेत बिघाड घडवून मानव आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेत आहे. जसे २००५-०६ आणि २००६-०७ मध्ये वाळवा आणि शिरगांव गांवामध्ये आलेल्या पुराला व त्यानंतर पसरलेल्या रोगराईला काही अंशी तेथील लोकच जबाबदार आहेत. पुरामुळे प्रचंड नुकसान झाले. गांवामध्ये बऱ्याच ठिकाणी कंबरेपर्यंत तर काही ठिकाणी गळ्यापर्यंत पाणी साचले होते. संपूर्ण वाहतूक व्यवस्था कोलमडून पडल्यामुळे दोन्ही गांवातील जीनजीवन ठप्प झाले. सर्वसामान्य माणसे, विद्यार्थी कार्यालयात आणि शेतकरी रस्त्यावर अडकून पडली. तेथील संपर्क व्यवस्था नादुरूस्त झाली होती. वीजपुरवठा खंडित झाला होता. सखल भागातील घरे, वसाहती आणि दुकाने पाण्यात बुडाल्यामुळे सर्व स्तरातील लोकांना ह्याचा फटका बसला. तर अशी ही पूराची आपत्तीमुळे सर्वत्र साचलेले कचऱ्यांचे ढीग, चिखलगाळ, मृत जनावरांची प्रेते, दूषित पाण्याच्या प्रादुर्भावामुळे मलेरिया, डेंग्यू, कॉलरा, गॅस्ट्रो, लेप्टापायरसिस हे संसर्गजन्य रोग पसरण्याची शक्यता निर्माण झाली होती.

**पुराचे परिणाम दोन प्रकारे घडून येतात :**

अ) विधायक परिणाम ब) विध्वंसक परिणाम

या दोन्ही परिणामांचा अभ्यास खालील प्रमाणे करण्यात आला आहे. पूराच्या विधायक परिणामापेक्षा विध्वंसक परिणाम मोठ्या प्रमाणात घडून येतात. याचीही मांडणी करण्यात आली आहे. या दोन्हीही परिणामांना नैसर्गिक आणि मानवनिर्मित कारणेही जबाबदार आहेत.

**अ ) विधायक परिणाम :**

नैसर्गिकरित्या आलेल्या पूरामुळे काही प्रमाणात विधायक स्वरूपांचे परिणाम घडून येतात.

१) प्रदूषित आणि कुजलेले पदार्थ पुराद्वारे समुद्रात दूरवर वाहत जाऊन त्यांची कायमची विल्हेवाट लागली.

२) पुरामुळे आजुबाजूच्या विहिरीतील पाण्याचे प्रमाण वाढले आहे. शिवाय जलाशयातील पाण्याचे प्रमाणही वाढलेले आहे.

**ब ) विध्वंसक परिणाम :**

अतिवृष्टी आणि पूराच्या आपत्तीमुळे काही विध्वंसक परिणाम घडून आले ते पुढीलप्रमाणे.

**१ ) शेतीवर झालेले परिणाम :**

अतिवृष्टी आणि पूर या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतामध्ये थोडीबहुत वाढीला लागलेली पीके नष्ट झाले, पीके नष्ट होण्याच्या प्रक्रियेमध्ये पीके कुजणे, वाहून जाणे, पिवळी पडणे, काळी पडणे इ. सर्व प्रकार पूरग्रस्त भागामध्ये घडले आहेत.

प्राथमिक मशागती करून पेरलेली पिके त्यासाठी केलेला खर्च, बी-बीयाणे पीक वाढीसाठी टाकलेली खते हे सर्व वाया गेले. जनावरांचा चारा नष्ट झाला,

भाजीपाल्याची पीके नष्ट झाली. तेव्हा बाजारात भाजीपाल्याची टंचाई निर्माण होते. पूरग्रस्त भागामध्ये दूभती जनावरे अडचणीत आली होती. तसेच नदीकाठी असलेले शेतीतील माती पूराच्या पाण्यात वाहून जाते.

**२ ) पशुधनावर झालेले परिणाम :**

पूरग्रस्त भागामध्ये पशुंच्या चाऱ्याचा प्रश्न हा फार गंभीर स्वरूप धारण करते. सर्वच ठिकाणी पाणीच-पाणी असल्याने चारा आणायचा कोठून हा प्रश्न निर्माण होतो. दूध संकलन काही काळासाठी स्थगित करण्यात आले होते. शहरात दूधाची फार मोठी टंचाई निर्माण होते. अपुऱ्या चाऱ्यामुळे तसेच दूषित पिण्याच्या पाण्यामुळे कुपोषणाने अनेक जनावरे मृत्यूमुखी पडली होती.

**३ ) आरोग्यावर झालेले परिणाम :**

नैसर्गिक पूर आपत्ती गांवामध्ये निर्माण झाल्यामुळे आरोग्यावर परिणाम झाले. पाणीपुरवठा, अन्नपुरवठा, यातून रोगराई पसरली होती. गॅस्ट्रो, कावीळ, फ्ल्यू, हिवताप, डेंग्यू, लेप्टोपायरीसिस या सारखे रोग उद्भवण्याची शक्यता निर्माण झाली होती. व्यक्ती, पाळीव प्राणी, या सर्व घटकावर आरोग्याचे परिणाम घडून आले होते. तसेच अनेक कारखान्यातील मळी, रसायने, पूराच्या पाण्यामध्ये सोडल्यामुळे पाण्यातील सजीव वनस्पतींचा फार मोठ्या प्रमाणात परिणाम झाला होता. पूर ओसरल्यानंतरही आजार, रोगराई, साथीचे रोग, ह्यामुळे लोकांचे आरोग्यमान खालावले होते.

**४ ) वाहतुकीवर झालेले परिणाम :**

सतत अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे संपर्क व्यवस्था कोलमडली होती. असे अनेक परिणाम वातहुकीवर झालेले होते.

**५ ) वीजपुरवठ्यावर झालेले परिणाम :**

सतत अतिवृष्टी आणि पूरामुळे मोठ्या प्रमाणात वीजपुरवठ्यावर परिणाम झाले. वीजपुरवठा करणाऱ्या वाहिन्या तुटल्यामुळे वीजपुरवठा खंडित होऊन अंधाराचे

साम्राज्य पसरले होते. वीजेच्या तारा जर पाण्यात पडल्या तर त्यातून वीजपुरवठा चालू राहिला तर विजेचा धक्का बसण्याची शक्यता निर्माण झाली होती. अशा अपघातात सापडलेली व पाण्यात बुडालेली अनेक जनावरे यांना आपले प्राण गमवावे लागले होते.

**६ ) पूराचे आर्थिक व इतर परिणाम :**

जेव्हा गांवामध्ये पूरस्थिती निर्माण होते तेव्हा आर्थिक परिणाम होतात. ते मोजण्यासाठी खालील गोष्टींचा विचार करावा लागतो.

१) पूरग्रस्त गांवातील लोकांना अन्न, वस्त्र, निवार या मूलभूत गोष्टी पुरविण्यासाठी लागणारा खर्च.

२) रोगराई पसरू नये म्हणून आरोग्य सेवा उपलब्ध करण्यासाठी करावा लागणारा खर्च.

३) पूर आल्यानंतर गांवातील लोकांना तत्कालीन स्थलांतर करण्यासाठी करावा लागणारा खर्च.

४) नदीकाठी बांधण्यासाठी घाट, रस्ते, घरे, सार्वजनिक इमारती, मंदिरे यांचे नुकसानीचा खर्च.

५) आपत्तीच्या काळात नष्ट झालेले रोजगार व त्यांचे वेतन उत्पन्न.

६) पूराच्या पाण्यामध्ये जंगम, स्थावर मालमत्तेची एकूण रक्कम.

वरील सर्व घटकांचे पूराच्या पाण्यामध्ये वाहून जातात किंवा त्या घटकावर पूराचे परिणाम घडून येतात.

## संदर्भ सूची


१) क्रांतीसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवा – पर्यावरण अहवाल, २००५-०६.

२) आपत्ती व्यवस्थापन कार्यालय, सांगली – २००७ पान नं. ४.

३) कित्ता – पान नं. ४

४) कित्ता – पान नं. ५

५) कित्ता – पान नं. ६

६) कित्ता – पान नं. ६, ७

७) कित्ता – पान नं. ८

८) कित्ता – पान नं. ९

९) दीपक नागनाथ – कृष्णेच्या महापूराची कारणे व उपाय, मासिक आंदोलन, फेब्रुवारी २००८, पान नं. ६.

१०) कित्ता – पान नं. ८

११) कित्ता – पान नं. ८

१२) सलिम मुजावर - पर्यावरणाचे अर्थशास्त्र, प्रकल्प अहवाल, २००५-०६, पान नं. २६.

१३) ग्रामपंचायत, वाळवा आणि शिरगांव.

१४) तहसिल कार्यालय, इस्लामपूर-२००५-०७.

१५) कित्ता – पानं नं. ०४.

१६) कित्ता - पान नं. ०४.

१७) कित्ता – पान नं. ०६.

१८) हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना लि. वाळवे, २००५-२००७.

१९) कित्ता – १८ प्रमाणे.